दुष्काळाच्या संकटात धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी २० हजारांचा बोनस द्या; आ. सुधीर मुनगंटीवार यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आग्रही मागणी

मागील खरीप हंगाम २०२५-२६ आणि चालू खरीप हंगाम २०२६-२७ अशा दोन्ही वर्षांचा बोनस देण्याची मागणी; मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर करून काल पुन्हा वेधले शासनाचे लक्ष

विधानसभेपासून मंत्रालयापर्यंत सातत्यपूर्ण पाठपुरावा; दुष्काळ, घटते उत्पादन आणि वाढत्या शेती खर्चामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या धान उत्पादकांच्या पाठीशी ठामपणे आ.मुनगंटीवार उभे

मुख्यमंत्र्यानी दिले कृषी विभागाच्या प्रधान सचिव यांना कार्यवाहीचे निर्देश

मुंबई : राज्यातील दुष्काळी परिस्थितीने शेतकऱ्यांच्या जगण्याचे आर्थिक गणित पूर्णपणे विस्कळीत झाले असताना धान उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी प्रति हेक्टरी २० हजार रुपये बोनस देण्याचा निर्णय आता अधिक काळ प्रलंबित ठेवू नये, अशी आग्रही मागणी आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे केली आहे. यासंदर्भात त्यांनी मुख्यमंत्र्यांना सविस्तर निवेदन सादर करून सन २०२५-२६ आणि सन २०२६-२७ या दोन्ही खरीप हंगामांसाठी पात्र धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी २० हजार रुपये बोनस देण्याची मागणी केली. विशेष म्हणजे, विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून हा प्रश्न उपस्थित करण्यापासून ते शासनाच्या विविध स्तरांवर सातत्याने पाठपुरावा करण्यापर्यंत आ. मुनगंटीवार यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत आपली संवेदनशीलता वारंवार अधोरेखित केली आहे. काल मुख्यमंत्र्यांची भेट घेतानाही त्यांनी या मागणीचा आग्रह पुन्हा एकदा ठामपणे मांडला. दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या धान उत्पादक शेतकऱ्यांना केवळ आश्वासन नव्हे, तर प्रत्यक्ष आर्थिक आधार मिळणे आवश्यक असल्याची भूमिका आ.मुनगंटीवार यांनी स्पष्ट केली.

राज्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी बांधवांसमोर मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे. पावसाचा अनियमितपणा, पावसाने दिलेली ओढ, पिकांच्या वाढीवर झालेला विपरीत परिणाम आणि पाण्याअभावी उत्पादनात होणारी घट यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर मोठा परिणाम झाला आहे. एका बाजूला बियाणे, खते, कीटकनाशके, मजुरी, डिझेल आणि सिंचनाचा खर्च सातत्याने वाढत आहे, तर दुसऱ्या बाजूला निसर्गाच्या लहरीपणामुळे अपेक्षित उत्पादनाची शाश्वती राहिलेली नाही. वर्षभर कष्ट करूनही हातात पुरेसे उत्पन्न येईल की नाही, अशी चिंता शेतकऱ्यांना सतावत आहे. कर्जाची परतफेड, मुलांचे शिक्षण, कुटुंबाचा उदरनिर्वाह आणि पुढील हंगामाच्या पेरणीसाठी लागणारा पैसा अशा असंख्य जबाबदाऱ्यांचा भार त्यांच्या खांद्यावर आहे.

विशेषतः चंद्रपूरसह पूर्व विदर्भातील धान उत्पादक शेतकऱ्यांचे संपूर्ण अर्थकारण या पिकावर अवलंबून आहे. धान शेती ही केवळ उत्पन्नाचे साधन नसून हजारो कुटुंबांच्या जगण्याचा आधार आहे. निसर्गाच्या संकटाशी झुंज देत शेतकरी पीक उभे करतो; मात्र वाढत्या उत्पादन खर्चाच्या तुलनेत मिळणारे उत्पन्न अपुरे ठरत आहे. अशा परिस्थितीत प्रति हेक्टरी २० हजार रुपये बोनस मिळाल्यास शेतकऱ्यांना मोठा आर्थिक आधार मिळू शकतो. त्यामुळे दुष्काळी परिस्थितीची तीव्रता लक्षात घेऊन शासनाने या मागणीवर तातडीने निर्णय घेणे आवश्यक असल्याचे आ. मुनगंटीवार यांनी निवेदनात नमूद केले आहे.

मागील खरीप हंगामांचा बोनस हा या मागणीतील अत्यंत महत्त्वाचा मुद्दा आहे. शासनाकडून साधारणतः मार्च महिन्यात धान उत्पादक शेतकऱ्यांच्या बोनसबाबत निर्णय जाहीर करण्याची पद्धत राहिली आहे. मात्र, सन २०२५-२६ या खरीप हंगामातील बोनस अद्याप जाहीर झालेला नाही. आता सन २०२६-२७ चा खरीप हंगामही संपण्याच्या मार्गावर असताना मागील हंगामातील बोनसबाबत कोणताही स्पष्ट निर्णय नसल्याने शेतकऱ्यांमध्ये संभ्रम आणि नाराजी निर्माण झाली आहे. एका हंगामातील बोनसची प्रतीक्षा सुरू असतानाच दुसऱ्या हंगामाचा शेती खर्च शेतकऱ्यांसमोर उभा राहिला आहे. त्यामुळे दोन्ही हंगामांसाठी स्वतंत्रपणे बोनस जाहीर करून शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा द्यावा, अशी मागणी आ.मुनगंटीवार यांनी केली आहे.

धान उत्पादक शेतकऱ्यांच्या या प्रश्नाबाबत आ. सुधीर मुनगंटीवार यांनी यापूर्वीही विधानसभेच्या अधिवेशनात लक्षवेधी सूचना मांडून शासनाचे लक्ष वेधले होते. केवळ सभागृहात प्रश्न उपस्थित करून थांबण्याऐवजी विधानभवनात प्रत्यक्ष भेटी, संबंधित मंत्र्यांशी चर्चा, निवेदने आणि सातत्यपूर्ण पत्रव्यवहाराच्या माध्यमातून त्यांनी या मागणीचा पाठपुरावा सुरू ठेवला आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत सभागृहात भूमिका मांडणे आणि त्यानंतर शासनाच्या निर्णयप्रक्रियेपर्यंत त्या प्रश्नाचा पाठपुरावा करणे, ही आ.मुनगंटीवार यांची कार्यपद्धती राहिली आहे. याच भूमिकेतून दिनांक ९ नोव्हेंबर रोजी मुंबई येथील वर्षा शासकीय निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे त्यांनी धान बोनसचा विषय पुन्हा आग्रहाने मांडला. त्यावर मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी कृषी विभागाचे प्रधान सचिव यांना कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

आज धान उत्पादक शेतकरी आपल्या न्याय्य मागणीसाठी आंदोलनाच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधत आहेत. शेतकऱ्यांना आपल्या हक्काच्या आर्थिक मदतीसाठी रस्त्यावर उतरावे लागणे ही चिंतेची बाब आहे. त्यांच्या अडचणींची तीव्रता आंदोलनाची वेळ येण्यापूर्वीच शासनाने समजून घेणे आवश्यक आहे. दुष्काळाच्या काळात शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहणे, त्यांच्या उत्पादन खर्चाचा विचार करणे आणि त्यांना आर्थिक स्थैर्य देण्यासाठी ठोस निर्णय घेणे ही शासनाची महत्त्वाची जबाबदारी असल्याचे आ. मुनगंटीवार यांनी अधोरेखित केले.

शेतकऱ्याच्या कपाळावरचा घाम, त्याच्या हातांवरील कष्टांच्या खुणा आणि पिकाच्या प्रत्येक दाण्यात गुंतलेली त्याची स्वप्ने यांचे मोल अनमोल आहे. दुष्काळाच्या झळांनी संसाराचे गणित कोलमडले, तरी शेतकरी नव्या आशेने मातीत राबतो आहे. अशा संकटसमयी त्याच्या पाठीशी उभे राहणे आणि त्याच्या कष्टांना आर्थिक आधार मिळवून देणे, हीच आपली जबाबदारी असल्याची भूमिका आ. सुधीर मुनगंटीवार यांनी सातत्याने मांडली आहे. विधानसभेपासून मुख्यमंत्र्यांच्या भेटीपर्यंत त्यांनी शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी पाठपुरावा केला आहे. दोन्ही खरीप हंगामांसाठी प्रत्येकी हेक्टरी २० हजार रुपयांचा बोनस जाहीर करून शेतकऱ्यांच्या कष्टांना न्याय द्यावा, अशी आग्रही मागणी आ.सुधीर मुनगंटीवार यांनी पुन्हा एकदा केली आहे.

सुधीर मुनगंटीवार

माजी मंत्री
विधानसभा सदस्य, महाराष्ट्र





जा.क्र. 1370 /नोव्हेंबर/2026 08/11/2026

प्रती,
मा. ना. श्री. देवेंद्रजी फडणवीस,
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य,
मंत्रालय, मुंबई.

प्र.स.-कृषी
त्यात मार्गदर्शनी
पाठवी

वंदे मातरम् !

विषय: राज्यात असलेली दुष्काळ परिस्थिती आणि धान उत्पादक शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती लक्षात घेता सन २०२५-२६ करीता प्रति हेक्टरी ₹ २०,००० बोनस देण्याबाबत तातडीने निर्णय घेण्याबाबत.

महोदय,

महाराष्ट्रातील, धान उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत मी सातत्याने शासनाचे लक्ष वेधत आहे. विधानसभेच्या अधिवेशनात लक्षवेधी सूचना मांडून तसेच विधान भवनात सातत्याने पाठपुरावा करून, प्रत्यक्ष भेटी, निवेदने व पत्रव्यवहाराच्या माध्यमातून धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी ₹ २०,००० बोनस देण्याची मागणी मी सातत्याने शासनासमोर मांडत आहे.

सध्या राज्यात असलेल्या दुष्काळ परिस्थितीमुळे शेतकरी बांधवांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले असून, शेतीतून अपेक्षित उत्पन्न मिळण्याची आशा मावळली आहे. पावसाचा अनियमितपणा, पावसाने ओढ दिल्यामुळे पिकांच्या वाढीवर झालेला परिणाम आणि पाण्याअभावी उत्पादनात होणारी घट यामुळे शेतकऱ्यांसमोर गंभीर संकट उभे राहिले आहे. एका बाजूला शेतीच्या उत्पादन खर्चात सातत्याने वाढ होत आहे, तर दुसऱ्या बाजूला दुष्काळामुळे अपेक्षित उत्पन्न मिळण्याची शक्यता कमी झाली आहे. परिणामी शेतकऱ्यांचे संपूर्ण आर्थिक गणित कोलमडले असून अनेक शेतकरी कर्जाच्या ओझ्याखाली दबले गेले आहेत.

आज शेतकऱ्यांची अवस्था अत्यंत विदारक झाली आहे.वर्षभर काबाडकष्ट करून, कर्ज काढून, पदरमोड करून शेतकरी आपल्या शेतात धानाचे पीक उभे करतो. मात्र निसर्गाच्या अनिश्चिततेमुळे त्याच्या हातात अपेक्षित उत्पन्न येईल की नाही, याची शाश्वती राहिलेली नाही. घरखर्च, मुलांचे शिक्षण, आरोग्यावरील खर्च आणि शेतीसाठी घेतलेल्या कर्जांची परतफेड अशा असंख्य जबाबदाऱ्यांचा भार त्याच्या खांद्यावर आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्याला आर्थिक आधार देणे ही केवळ शासनाची जबाबदारी नसून काळाची गरज आहे.

धान उत्पादक शेतकऱ्यांचा वाढलेला उत्पादन खर्च, मजुरी, खते, बियाणे, कीटकनाशके, डिझेल तसेच नैसर्गिक संकटांमुळे होणारे नुकसान यामुळे शेतकऱ्यांवर मोठा आर्थिक भार पडत आहे. धान पिकावर अवलंबून असलेल्या चंद्रपूरसह पूर्व विदर्भातील असंख्य शेतकरी कुटुंबांचे संपूर्ण अर्थकारण या पिकावर अवलंबून आहे. त्यामुळे या शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी प्रति हेक्टरी ₹ २०,००० बोनस देणे अत्यंत आवश्यक आहे.

सन २०२५-२६ चा खरीप हंगाम संपून आता सन २०२६-२७ चा खरीप हंगामही संपण्याच्या मार्गावर आला आहे. असे असतानाही मागील हंगामातील धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी ₹ २०,००० बोनस देण्याबाबत अद्याप शासनाकडून निर्णय जाहीर झालेला नाही. त्यामुळे मागील वर्षाचा बोनस शेतकऱ्यांना मिळणार की नाही, याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे.

राज्यातील दुष्काळ परिस्थितीमुळे आधीच आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी ही बाब चिंतेची आहे. एकीकडे शेतकऱ्यांनी मागील हंगामातील बोनसची अपेक्षा ठेवलेली असताना दुसऱ्या हंगामातील शेतीचा खर्चही त्यांच्या डोक्यावर आला आहे. अशा वेळी मागील हंगामातील बोनसबाबत अनिश्चितता कायम राहणे शेतकऱ्यांच्या अडचणींमध्ये भर घालणारे आहे. त्यामुळे सन

पत्ता : भाग्यश्री गोल बाजार वार्ड, चंद्रपूर-४४२ ४०२, महाराष्ट्र, भारत
दुरध्वनी (कार्या.) ०७१७२-२५२५८२, (निवास) ०७१७२-२७३९०० (मो.) +९१-७७२२०७४१९९, प्रसाद उकीर्डे (PA) - +९१-९९७५२३४३४४
+91-7722074199 SudhirMungantiwar Sudhir.Mungantiwar https://sudhirmungantiwar.com
@SMungantiwar @SudhirMungantiwar sudhirbhau.mungantiwar@gmail.com bjp03069@gmail.com

सुधीर मुनगंटीवार

माजी मंत्री

विधानसभा सदस्य, महाराष्ट्र

वंदे मातरम् १५०

वेद मंत्रापासून आम्हा लाभे वंदे मातरम्

२०२५-२६ या मागील हंगामातील बोनसबाबत शासनाने तातडीने स्पष्ट निर्णय घेऊन पात्र शेतकऱ्यांना लाभ द्यावा. तसेच सन २०२६-२७ या चालू खरीप हंगामासाठीही प्रति हेक्टरी ₹ २०,००० बोनस देण्याबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा.

मी विधानसभेच्या अधिवेशनात लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून हा विषय शासनाच्या निदर्शनास आणून दिला आहे. त्यानंतरही सातत्याने प्रत्यक्ष भेटी, निवेदने आणि पत्रव्यवहाराच्या माध्यमातून या मागणीचा पाठपुरावा करीत आहे. मात्र, सध्याची शेतकऱ्यांची परिस्थिती पाहता आता केवळ आश्वासनांपेक्षा ठोस निर्णयाची आवश्यकता आहे.

त्यामुळे आपणास आग्रहाची विनंती आहे की,

१. सन २०२५-२६ या खरीप हंगामातील धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी ₹ २०,००० बोनस देण्याबाबत तातडीने निर्णय घेऊन त्याची घोषणा करावी.

२. सन २०२६-२७ या चालू खरीप हंगामासाठीही धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी ₹ २०,००० बोनस देण्याचा निर्णय घ्यावा.

३. शासनाच्या निकषांनुसार पात्र असलेला एकही धान उत्पादक शेतकरी बोनसच्या लाभापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी.

४. बोनसची रक्कम पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट जमा करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी.

चंद्रपूरसह पूर्व विदर्भातील असंख्य शेतकऱ्यांचे जीवनमान आणि त्यांच्या कुटुंबाचे अर्थकारण धान पिकावर अवलंबून आहे. आज राज्यातील दुष्काळ परिस्थितीमुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्याला शासनाच्या मदतीची नितांत गरज आहे. शेतकऱ्याच्या डोळ्यांतील चिंता दूर करून त्याच्या कष्टाला आर्थिक आधार देण्याची हीच योग्य वेळ आहे.

शेतकऱ्याला आंदोलन करावे लागल्यानंतर मदत करण्यापेक्षा, त्याच्यावर संकट असताना शासनाने त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे अधिक महत्त्वाचे आहे. त्यामुळे मागील हंगामातील बोनसबाबत तातडीने निर्णय घेऊन चालू हंगामासाठी ही प्रति हेक्टरी ₹ २०,००० बोनस जाहीर करून धान उत्पादन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा हि विनंती.

कार्यवाहीची रुपरेषा कळविल्यास मी आपला आभारी राहिल.

धन्यवाद.

आपला

(सुधीर मुनगंटीवार)

प्रत :

1. मा. जिल्हामार्केटींग अधिकारी चंद्रपूर.
2. श्री. बंडू गौरकार सदस्य महाराष्ट्र राज्य कृषीमुल्य आयोग मुंबई.
3. श्री. हरीश ढवस भाजपा तालुकाध्यक्ष पोभुर्णा जिल्हा चंद्रपूर.
4. श्री पिंटू देऊळकर भाजपा तालुका अध्यक्ष बल्लारपूर जिल्हा चंद्रपूर
5. श्री चंदू मारगोनवार र भाजपा तालुकाध्यक्ष मुल जिल्हा चंद्रपूर
6. श्री श्रीनिवास जंगमवार तालुकाध्यक्ष चंद्रपूर जिल्हा चंद्रपूर

पत्ता : भाग्यश्री गोल बाजार वार्ड, चंद्रपूर-४४२ ४०२, महाराष्ट्र, भारत

दुरध्वनी (कार्या.) ०७१७२-२५२५८२, (निवास) ०७१७२-२७३९०० (मो.) +९१-७७२२०७४१९९, प्रसाद उकीर्डे (PA) - +९१-९९७५२३४३४४

+91-7722074199 SudhirMungantiwar Sudhir.Mungantiwar https://sudhirmungantiwar.com

@SMungantiwar @SudhirMungantiwar sudhirbhau.mungantiwar@gmail.com bjp03069@gmail.com